# डफला जमातींचे समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर)**
*विभागप्रमुख, सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग*
*वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर*

***गोषवारा :***
*भारत हा वैविध्यतेने नटलेल्या विविध जाती, धर्म, पंथ यांनी संपन्न असलेला खंडप्राय देश आहे. भारताचे भौगोलिक क्षेत्रफळ 32,87,263 चौरस किलोमीटर आहे. क्षेत्रफळाच्या निकषाप्रमाणे भारताचा जगामध्ये सातवा क्रमांक लागतो. भारताची उत्तर–दक्षिण लांबी 3,214 कि.मी. व पूर्व पश्चिम लांबी 2,933 कि.मी. आहे. म्हणूनच भारताला उपखंड असे संबोधले जाते. भारतात एकूण 28 घटक राज्य व 7 केंद्र शासीत प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात डोंगराळ व पर्वतीय प्रदेशात वास्तव्यास असलेल्या विविध जाती, पगडी यांनी आपले सांस्कृतिक स्थान आजतागायत जपून ठेवलेले आहे. भारतामध्ये विविध प्रकारच्या जाती जमाती एकत्रित राहताना दिसून येतात. त्यातीलच एक महत्वाची जमात म्हणजे डफला आदिवासी जमात होय.*

***शब्दांकन :***
*डफला, जमात, कन्यामूल्य.*

**प्रस्तावना :**
डफला ही एक जमात आहे. हे आदिवासी लोक नेफाच्या सुबनगिरी विभागात राहतात. हा भाग पर्वतश्रेणीनी व्यापलेला असून समुद्र सपाटी पासून चार ते चौदा हजार फूट उंच आहे. डफलांचे मूलस्थान कोणते व ते त्यांनी केव्हा सोडले, याविषयी काहीच माहिती उपलब्ध नाही. पण सर्व डफला आपल्याला आबो तेनी नामक एक पुरुषाचे वंशज मानतात आणि हिमालयाच्या अतिपूर्वेकडील सुपुंग नामक एका ठिकाणी आपले मूळ वास्तव्य होते, असे समजतात.

**संशोधनाची उद्दिष्टे :**
1. डफला आदिवासी जमातीची पार्श्वभूमी माहिती करणे.
2. डफला आदिवासी जमातीच्या समस्या जाणून घेणे.

**संशोधनाचे गृहितक :**
1. डफला आदिवासी जमाती अत्यंत आर्थिक बिकट अवस्थेत जीवन जगत आहे.
2. डफलांच्या सामाजिक, शैक्षणिक, अंधश्रध्दा, विवाहविषयक समस्या वाढतच जात आहे.

**संशोधन आराखडा :**
प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला गेला आहे.

**तथ्य संकलन :**
प्रस्तुत संशोधनात दुय्यम स्तोत्राचा उपयोग केला आहे.

**संशोधनाचे महत्व :**
डफला जमात जी हिमालयाच्या पायथ्यांशी राहणारी आहे. शास्त्रोक्त अभ्यासानंतर ज्या समस्या उजागर झाल्या त्यातून ज्या काही उपाययोजना योजिल्या जातील. कदाचित त्यांच्या समस्या निराकरणास महत्वपूर्ण सिध्द होऊ शकतात.

**तक्ता क्रमांक – 1**
महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या

| अ. क्र. | जनगणना वर्ष | राज्याची एकूण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या हजारात | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | 1961 | 39,554 | 2,397 | 6.06 |
| 2 | 1971 | 50,412 | 3,841 | 7.62 |
| 3 | 1981 | 62,784 | 5,772 | 9.19 |
| 4 | 1991 | 78,937 | 7,318 | 9.27 |
| 5 | 2001 | 96,879 | 8,577 | 8.85 |
| 6 | 2011 | 1,12,374 | 10,510 | 9.35 |
| स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2013–14 | | | | |

**पुरुष वेशभूषा :–**
डफला पुरुष कमरेभोवती एक जाडे भरडे कापड गुंडाळतात. एका रानटी झुडपाच्या धांडयापासून विणलेल्या धोंगडयाने ते छातीपासून अर्ध्या मांडयापर्यंतचा भाग झाकून घेतात. क्वचित एखादा पुरुष त्यावर चामडे पांघरतो. सर्व पुरुष गळयात वंशपरांराप्राप्त रंगीबेरंगी मण्यांच्या माळा घालतात. याशिवाय पितळेच्या साखळया, रानडुकरांचे व हिरणांचे सुळेही त्यांच्या गळयांत असतात. त्यांच्या डाव्या हातात केसांची कडी व उजव्या हातात बांगडया असतात. कमरेभोवती ते वेताची अनेक कडी घालतात व गुडघ्यांखाली विणलेल्या वेताचे बंद बांधतात. याशिवाय ते आपल्या अंगावर तिबेटी तलवार, चाकू काळया–तांबडया पट्टयांची लोकरी पट्टी व तंबाकू आणि चिलीम यांची पिशवी बाळगतात. मस्तकावर विणलेल्या वेताचे शिरस्त्राण घालतात. विविधरंगी पिसे शिरस्त्राणात खोचून त्याची शोभा वाढवतात. केसांची वेणी घालून कपाळावर तिचा आंबाडा घालतात. त्याला 'पोडूम' असे नाव आहे. त्यात सुमारे एक फूट लांबीची पितळी सळई आडवी खोचतात. मस्तकाभोवती विणलेल्या वस्तूंची पट्टी बांधतात. तिच्यावर धातुच्या बारीक घंटा बसवतात, कानात वलये घालतात.

**स्त्री वेशभुषा :–**
स्त्रिया कमरेभोवती पट्टयापट्टयांचा व हिरवी किनार असलेला परकर नेसतात. त्याच प्रकारचे ब्लँकेट उत्तरीय म्हणून घेतात व ते उजव्या खांद्यावर बांधतात. केसांचा अंबाडा मानेवर घालतात किंवा त्यांची वेणी घालून ती मस्तकाभोवती गुंडाळतात. मुलींचे केस अनेकदा मानेवर मोकळे सोडलेले असतात. त्यांच्या गळयात रंगीबिरंगी मण्यांच्या खूप माळा असतात. याशिवाय पितळी साखळया, धातूच्या घंटा, चहाचे चमचे इत्यादी वस्तूही त्या गळयात घालतात. त्या कानात मोठमोठी वलये व हातात बांगडया

घालतात. पायात घोटयाजवळ गच्च बसणारे विणलेले वेताचे बंद घालतात. पण त्यामुळे त्यांच्या सौंदर्यात भर पडण्याऐवजी पाय मात्र आवळले जातात. पूर्वी डफला स्त्रिया कापसांचे सूत बनवून जाळे भरडे कापड विणीत, पण हल्ली हे लोक आसामच्या बाजारपेठेतून गिरण्यांचे विविध रंगाचे विशेषतः काळे आणि लाल सुती कापड खरेदी करु लागले आहेत. डफला ग्रामपुरुष व पुरोहित सरकारने दिलेला लाल कोट अंगात घालतात. सुबनसिरी विभागात वेत व बांबू खूप वाढतात. डफलांचे हे कल्पवृक्षच होत. त्यांच्या रोजच्या जीवनात त्यांचा विविध प्रकारे उपयोग होतो. बांबूपासून ते पाण्याची भांडी, मद्याचे पेले, चमचे, बशा, चिमटे, चिलिम, टोपली, चरवा, धनुष्यबाण, भाते, भाले इत्यादी विविध वस्तू बनवतात. वेतापासून ते दोऱ्या, दोरखंडे, नाजूक चटया, टोपल्या, पिशव्या पंखे, कंगवे इत्यादी वस्तू तयार करतात. चामडयाच्याही ते पिशव्या वगैरे वस्तु बनवतात. डफला लोक कापूस पुष्कळ पिकवतात. पण तो ते अपातानींना देतात व त्याच्या बदली त्यांच्याकडून तांदूळ व डुकरे घेतात. लोखंडापासून तलवारी व चाकू बनवतात, त्याचप्रमाणे ते ब्रॉंझ व चांदी यांचे दागिनेही घडवतात.

**व्यवसाय** :–

डफला हे उत्तम शिकारी आहेत. प्रत्येक पुरुषाकडे स्वतःचे धनुष्य, साधे व विषारी बाण, काता व लाल माकडाच्या चामडयाची पिशवी व वस्तू असतात. मुलाला शरसंधानाचे शिक्षण लहानपणीच मिळते. शिकार हा डफलांचा आवडीचा उद्योग आहे. कारण त्यामुळेच त्यांना मांस खायला मिळते. काही वेळा जंगलात सापळे लावून ते पशुपक्ष्यांना पकडतात. डफलांना मासेही आवडतात. नदीच्या पात्रात बांबू व लाकूड यांचे बांध घालून त्यात ते मासे पकडतात. डफला लोक डुकरे, गायी, शेळया, कोंबडया व कुत्रे पाळतात. शेती हा डफलांचा प्रमुख व्यवसाय आहे. ते झूम पध्दतीने शेती करतात. तीन चार वर्षे एका जागी पीक काढल्यावर ती जमीन नापीक होते व त्यांना दुसरी जागा शोधावी लागते. शेतीच्या जागेतील झाडे तोडणे हे फार कष्टाचे काम असते. आणि पुरुषच ते करु शकतात. झाडे तोडल्यावर ती काही दिवस वाळू देतात व मग त्यांना आग लावतात. हे काम डिसेंबर ते मार्च या महिन्यात चालते. स्त्रियांचीही काही शेते असतात. त्यातली झाडे घरातील पुरुष गावच्या पुरुषांच्या मदतीने तोडतात. मदतीला येणाऱ्यांना त्या जेवायला वाढतात व हवे तितके मद्यही देतात.

**आहार**:

भात, मांस, भाज्या, मक्यांची भाकरी, रताळयासारखे कंद, बांबूचे कोंब व मद्य हा डफलांचा आहार होय. रोज ताजे मास मिळणे शक्य नसल्यामुळे हे लोक मांस धुरी देऊन वाळवून ठेवतात व प्रसंगाप्रसंगाने पाण्यात भिजवून खातात. त्यांच्या सर्व धार्मिक व सामाजिक प्रसंगी मद्याला महत्वाचे स्थान आहे. टिमी नामक धान्याचे मद्य त्यांना अधिक आवडते. तांदूळाच्या मद्याने पोट दुखते तर मक्याच्या मद्याने डोके दुखते, अशी त्यांची समजूत आहे.

**पूर्वज** :

सर्व डफला आणे तेनी या पुरुषाला आपला पूर्वज मानतात. त्याचा नातू रिगडो याला डोडुम, डोल व डोपुम असे तीन पुत्र होते. या तीन मुलांच्या नावावरुन डफलांचे तीन वर्ग पडले आहेत. त्यापैकी पहिल्या दोन वर्गाचे डफला संख्येने अधिक असून डोयूम डफला अगदी कमी आहेत. या तीन्ही वर्गात परस्पर रोटी बेटी व्यवहार होतो. या वर्गाचे गोत्र व कुळे एकाच गोत्रात व कुळात लग्ने होत नाहीत.

**कुटुंब व्यवस्था** :

एक डफला कुटुंबात एक कर्ता पुरुष, त्याच्या बायका व मुले एवढी माणसे असतात. गृहस्थ पुरुष बहुधा सर्वात मोठया पत्नीकडे राहायला असतो पण आळीपाळीने तो सर्व स्त्रियांकडे जातो. पहिली पत्नि वृध्द किंवा वाझं असल्यास तो दुसऱ्या पत्नीकडे राहतो. काही वेळा डफला कुटुंबात कर्त्या पुरुषाचे सख्खे किंवा चुलत भाऊ व त्यांची कुटुंबे राहतात. पण एकाच घरातील ही कुटुंब एकमेकांपासून स्वतंत्र असतात. त्यांची शेती व धान्याचे कोठारही वेगळे असते. सर्व कुटुंबातील सर्व पुरुष एकमेकांच्या शेतात आळीपाळीने काम करतात. कुटुंबातील लहान मुले वडीलांप्रमाणे चुलते व आजोबा यांचीही आज्ञा पाळतात. वरिष्टांची आज्ञा पाळायला मुलांना लहानपणापासूनच शिकवतात. मुले मोठी झाली म्हणजे घरातला कर्ता पुरुष घरच्या व्यवहाराबाबत मुलांचा सल्ला घेतो. डफलांची कुटुंब पध्दती पितृसत्ताक आहे. वंशावळ लक्षात राहील अशी खबरदारी ते मुलांचे नाव ठेवतानाच घेतात. बापाच्या नावाने ते अंत्याक्षर ते मुलाच्या नावाने आद्याक्षर असते. उदा. हेरिंच्या मुलाचे नाव रिंगडो असे असते.

**स्त्री दर्जा** :

डफला लोकांत स्त्रियांच्या हक्काबद्दल काही कायदेशीर तरतूद नाही. स्त्री ही विकत घेतलेली मालमत्ता असून, नवऱ्याचा तिच्या शरीरावर पूर्ण हक्क असतो. अशी डफलांची धारणा आहे. त्यामुळे पतीने पत्नीला मारझोड केली किंवा प्रसंगी तिला ठार मारले, तरीदेखील तिचे नातेवाईक त्याबद्दल कायदेशी इलाज करु शकत नाहीत. धार्मिक क्षेत्रातही डफलांच्या स्त्रियांना काही अधिकार नाही. घरातल्या व्यवहारात मात्र त्यांना पुरेसे स्वातंत्र्य असते. डफलांच्या घरात प्रत्येक पत्नीची स्वतःची वेगळी चूल असते. तिच्या मालकीची थोडी शेतजमीनही असते. त्यात ती स्वतः खपून पीक काढते. कापणीच्या वेळी नवरा तिला मदत करतो. तिने काही कोंबडया, डुकरे किंवा बकऱ्या पाळलेल्या असतात. याशिवाय सरपण गोळा करुन आणणे, रताळी, अळंबी, काळया वगैरे आणून मुलांना त्या शिजवून घालणे, हे ही काम तिलाच करावे लागते. रोज नवऱ्याला जेवायला घातलेच पाहिजे, असे तिच्यावर बंधन नसते. सर्व बायका आपसात त्याबद्दल काय ते ठरवतात. पण पतिनिष्ट स्त्री मात्र आपल्या नवऱ्याला रोजमद्य तरी देतेच. तिबेटातील लोळी नसलेल्या घंटा (मजी) धातूच्या थाळया तालू या मौल्यवान समजल्या जाणाऱ्या वस्तू मोठया पत्नीच्या ताब्यात असतात व ती त्या गुपचूप जमिनीत पुरुन ठेवते. गृहव्यवस्थेत तिलाच जास्त अधिकार असतो.

**प्रसूतीप्रथा**:
मूलही वियू देवतांची देणगी आहे. असे डफला समजतात. बाळंतपण बहुधा कोंबडयासाठी तयार केलेल्या जागेत होते. प्रसुतीच्या दुसऱ्या दिवशी पुरोहिताला बोलावतात. तो कोंबडीच्या पिल्लाच्या यकृतावरुन काही शकून पाहतो आणि मुलाचे नाव ठेवतो. मुलीचे नाव महिन्यानंतरही ठेवतात. नामकरणाच्या दुसऱ्या दिवशी आप्तेष्टांना मद्य देतात किंवा शक्य असल्यास जेवणही घालतात. प्रसूतीनंतर सहा दिवसांनी स्त्री घरातले कामकाज करु लागते. बाळंतीण होताना स्त्री अडली, तर ती वियूंची अवकृपा समजून त्यांना बलिदान करतात. बाळंतपणात स्त्री मेली आणि कोंबडीच्या अंडयाच्या शकुनावरुन तिचे मूल दुर्देवी आहे, असे ठरले, तर आईबरोबरच त्या जिवंत मुलालाही पुरुन टाकतात. पहिले सहा महिने मूल आईच्या किंवा दुसऱ्या कोणत्या तरी स्त्रीच्या हातावर असते. नंतर त्याला कोणाच्या देखरेखाखाली झोळीत ठेवतात.

**विवाहप्रथा** :
डफला पुरुष अनेक बायका करतात. त्यांची ते जी अनेक कारणे सांगतात, त्यापैकी काही अशी शेतात काम करण्यासाठी त्यांना स्त्रियांची गरज असते, हे पहिले अनेक लग्न केल्याने लैंगिक विषयात विविधता अनुभवायला मिळते, हे दुसरे, पुष्कळ संतती मिळते, हे तिसरे व सामाजिक प्रतिष्ठा लाभते, हे चौथे होय. एकाच पुरुषाने अनेक बायका केल्यामुळे इतर काही पुरुषांना बायको मिळणे अवघड होत असेल, असे वाटते, पण प्रत्येक लग्नाच्या वेळी कन्याशूल्क द्यावे लागत असल्यामुळे आणि सर्वांनाच ते परवडण्यासारखे नसल्यामुळे बायकांच्या संख्येला आपोआपच मर्यादा पडते. शिवाय अविवाहीत मुलाला, जनक माता सोडून, त्याच्या बापाच्या मालमत्तेचा भाग म्हणून सर्व विधवाही पुष्कळदा भार्या म्हणून उपभोगायला मिळतात.

**कन्यामूल्य प्रथा** :
कन्यामूल्य देवून वधू मिळवणे, हा लग्नाचा आदर्श प्रकार समजला जातो. पण काही वेळा डफला तरुण यापेक्षा इतर मार्गाचाही अवलंब करतात. प्रेयसीला पळवून आणणे हा त्यातला एक मार्ग होय. एखाद्याा पुरुषाने तिच्या आईबापांकडे कन्याशूल्काचा एखादा हफ्ता दिलेला असेल तर मात्र आईबाप अशा पळवून नेलेल्या मुलीला शोधून घरी आणतात. मग तिचा प्रियकर कन्यामूल्य देतो व त्यातून पहिल्या पुरुषाकडून घेतलेले शूल्क त्याला परत केले जाते. काही वेळा डफला पुरुष आपल्या भावी सासऱ्याच्या घरी दोन वर्षे काम करतो व मग त्याच्या मुलीशी लग्न करतो. डफला पुरुष आतेबहिणीशी लग्न करीत नाहीत, पण मावशीशी मात्र करतात.

**राजकीय जीवन** :
भारत सरकारचे प्रशासन सुरु होण्यापूर्वी डफला लोकांचे जीवित व वित्त सुरक्षित नव्हते. बारीकसारीक भांडणावरुन डफला लोक एकमेकांचा जीवही घेत असत. शत्रूने आधी त्यांच्यापैकी कोणाला ठार मारले असेल, तर शत्रूपैकी कोणालाही ते ठार करीत. चोरीसारख्या अपराधाबद्दल ते शत्रू पक्षाकडच्या स्त्री पुरुषांना पकडून आणीत. ठार मारलेल्या शत्रूचा डावा पंजा कापून घेऊन डफला पुरुष परत आपल्या प्रदेशात येत. मग सर्व जण जमून बसाट युजिंग म्हणजे लाकडाचा व बांबूचा मांडव बांधून त्याच्यावर तो कापून आणलेला हात ठेवीत व त्यावर थोडे मद्य ओतीत. मग सर्वपुरुष आनंदाने बेहोश होऊन नृत्य करीत. पुरोहीत त्यावेळी मंत्र म्हणत. नंतर तो हात एका विशिष्ट झाडाच्या खोडाला बांधून ठोकून टाकीत आणि त्या हातावर बाण मारीत. ते पकडून आणलेल्या शत्रूचा पाय खोडयात अडकवून ठेवीत. मग त्याचे आप्तेष्ट त्याबद्दल दंड भरुन त्याला सोडवून नेत. अन्यथा त्याला गुलाम म्हणून त्यांच्याकडे राहावे लागे.

**देवधर्म** :
डफलांच्या मते वियूंचे वास्तव्य सर्वत्र असते. त्यापैकी काही वियू देवता उपकारक असतात. आने डूडूनी किंवा सुर्यमाता ही कृपाळू  असते आणि तिच्या कृपेनेच माणसाला संतती व संपत्ती मिळते. तिला ते मिथूनाचा बळी देतात. दोजिंम, थापोम, जेंगटे इत्यादी वियू माणसांना आजारी पाडून त्यांचा बळी घेतात. म्हणून वियूंना बळी देऊन संतुष्ट केले जाते. बळी देण्यासाठी घराच्या जवळच युजिंग नामक बांबूचा मांडव असतो. त्याला भूताखेतांचे प्रतिक मानतात. बळी द्यायचे प्राणी त्या प्रतीकाला बांधून ठेवतात. बळी दिलेल्या प्राण्याची यकृते बाहेर काढून त्यापासून शकून घेतात. डुकरे आणि मिथुने यांचे रक्त बांबूच्या भांडयात गोळा करतात व गरम करुन कुळातले लोक ते पितात. डफला लोकात पुरोहिताला फार मान असतो व धार्मिक विधिप्रमाणेच जन्म, मृत्यू, बळी इत्यादी प्रसंगातही त्याची आवश्यकता असते. रोग्याला औषध देण्याचे कामही तोच करतो.

**मार्तिकप्रथा** :
डफला लोक घराच्या जवळच प्रेते पुरतात. पुरायच्या जागी बांबू व लाकूड यांचा मानोरा उभारतात आणि ते पाने व पशुंची शिंगे यांनी शृंगारतात. मृताबरोबर मद्याचा भोपळा व भाताची मडकी मृताचे पाथेय म्हणून पुरतात. पुरलेल्या जागेजवळ संध्याकाळी अग्नी पेटवतात व तिथे अन्न आणि मद्य ठेवतात.

**डफलाच्या समस्यावरील उपाययोजना** :

- सर्व स्तरावर होणारे आदिवासी शोषण थांबविणे त्याकरीता प्रभावी उपाय योजना आखणे.
- समाजाच्या मुख्य प्रवाहापासून डफला जमात दूर होत गेली. तिला मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे, त्याकरीता दळणवळणासाठी साधने वाढविणे, शैक्षणिक विकास घडविणे व शास्त्रीय उत्पादन पध्दतीची माहिती त्यांना करुन देणे.
- या आदिवासीमध्ये आत्मविश्वासाचा अभाव आहे, त्यांच्यावर होणारा अन्याय व शोषण यामुळे त्यांच्या जीवनात तरुणांना व त्यांच्यातील नव्या नेतृत्वाला स्वतःचा विकास करण्याचा आत्मविश्वास निर्माण करण्याचे शिक्षण देणे.

- तोटयात जाणारी डफला आदिवासींची शेती किफायतशीर होऊ शकेल अशी उपाययोजना करणे व त्या योगे आदिवासींचे जीवनमान उंचावणे.
- आदिवासी विभागात शेती व्यवसायात पूरक धंद्याचा अभाव आहे ती दूर करणे.
- आदिवासींना लागणारा कर्जपुरवठा सहकारी पध्दतीने करणे व त्यासाठी सहकारी संस्थाचे जाळे पसरुन त्याद्वारे पतपुरवठा करणे. आदिवासींच्या शेतमालाला योग्य भाव मिळवून देणे व त्यांच्या दैनंदिन गरजा भागविणे.
- डफलांच्या स्त्रीयांकडे बघण्याच दृष्टिकोण नकारात्मक आहे. त्यामुळे प्रबोधनाद्वारे स्त्रीदर्जा उंचावण्याचा प्रयत्न गरजेचे आहे.
- विवाहविषयक वयात अंतर असल्यामुळे स्त्रीला अनेक अत्याचाराला पुढे जावे लागते, त्यामुळे संवैधानिक स्वरुपाने विवाह योग्य वयाचे काटेकोरपणे झाल्यास स्त्रीयांना संरक्षण प्राप्त होऊ शकते.
- प्रबोधनाच्या माध्यमातून किंवा लोकगीतातून प्रचलित असणाऱ्या अंधश्रध्दांचे प्रमाण कमी करता येऊ शकते.

**संदर्भ ग्रंथ**


1. *गारे गोविंद (2002) 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' कान्टीनेन्टल प्रकाशन, पुणे पृ. 2, 20.*
2. *भारतीय संस्कृतिकोश, तिसरा खंडा संपादक : पंडित महादेवशास्त्री जोशी. भारतीय संस्कृतिकोष मेऽऽ, 413 शनिवार पेठ, पुणे 2.*
3. *https://edgcofhumanity.lom*
4. *https://www.clearias.com*
5. *https://indiantribalheritage.org*
6. *https://jstog.org*
7. *https:// eh.m.wikipedia.org*
8. *आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तिका (2011–12) पुणे 55 जव 63*